■ e-paper.diwanews.com ■ सोमवार, ३० सप्टेंबर २०२४ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 www.diwanews.com

# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

वर्ष–४

अंक–९

# दिवा शहरात स्वच्छतेचा बोजवारा

दिवा :- शहरात पुन्हा एकदा कचराकोंडी झाली असून स्वच्छतेचे तीन तेरा वाजले आहेत. ठाणे महापालिका प्रशासनाच्या स्वच्छतेच्या दाव्याचा दिवा शहरात बोजवारा उडाला असून दिवा शहरात कचरा समस्या गंभीर झाली आहे. अनेक भागात रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे ढीग साचलेले दिसत असून अनेक इमारतींमधील कचरा दररोज उचलला जात नसल्याच्या तक्रारी नागरिकांतून होत आहेत.

## रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे ढीग, दुर्गंधी मुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

### अनेक भागात इमारतींमधील कचरा उचलला जात नसल्याच्या नागरिकांच्या तक्रारी



एसएमजी शाळेजवळ धर्मवीर नगर



दिवा स्टेशन ब्रिज खालचा कचरा

कचरा समस्येमुळे होणाऱ्या दुर्गंधीतून आजार फैलावण्याचा धोका असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.कचऱ्याच्या गाड्या दिवा शहरातील अंतर्गत भागात येत नसल्याने ही कचरा समस्या झाल्याचे नागरिक सांगतात. दुसरीकडे दिवा शहरातील मुख्य रस्ता असणाऱ्या दिवा- आगासन रस्त्यालगत धर्मवीर नगर, एस एम जी स्कूलच्या जवळ रस्त्याच्या कडेला कचरा साचलेला पाहायला मिळत आहे. हीच स्थिती दिवा शीळ या मुख्य रोडला पाहायला मिळत असून हा रोड मिनी डम्पिंग ग्राउंड झाल्याचे मागच्या काही दिवसात दिसून येत आहे.

नागरिकांच्या घरातील कचरा उचलला जात नसल्याने कचरा समस्या गंभीर झाली असून दिवा शहराचे आरोग्य धोक्यात आले आहे. यापूर्वीही दिवा शहरातील कचरा समस्येबाबत दिवा न्यूजने वारंवार आवाज उठवला असून पालिका प्रशासन मात्र सुस्तावलेल्या स्थितीत आहे. एकीकडे स्वच्छतेच्या नावाखाली पैसे खर्च करायचे आणि दुसरीकडे दिव्यासारखं दाटीवाटीने वसलेले शहर गलिच्छ ठेवायचं याबाबत आता नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे. दिवा शहरातील कचरा समस्येवर पालिका प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात व इमारतींमधील कचरा संकलनाचे काम नियमितपणे करावे अशी मागणी आता नागरिकांतून होत आहे.

## दिव्यातील कचरा उचला...

### अन्यथा पालिका मुख्यालयासमोर कचरा आणून टाकू



-ज्योती पाटील

महिला संघटीका

शिवसेना (ठाकरे गट)


दिव्यात होणाऱ्या कचरा समस्येबाबत वारंवार पालिका प्रशासनाकडे पत्र व्यवहार केला आहे. या आधीही पालिकेला या समस्येची जाणीव आम्ही करून दिली आहे. कचरा समस्येमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शहरातील अनेक भागात रस्त्याच्या कडेला कचरा टाकला जातो. इमारतींमधला कचरा तीन –चार दिवस उचलला जात नाही. दिवा शहरातील कचरा समस्येवर पालिकेने तोडगा काढावा,अन्यथा ठाणे महापालिका मुख्यालयासमोर कचरा आणून टाकण्याचे आंदोलन येथील नागरिकांच्या वतीने आम्ही करू!

## पालिकेच्या दुर्लक्षामुळे दिव्याचं डम्पिंग ग्राउंड झालंय



दिवा स्टेशन तलावाचा कचरा

एकीकडे पालिका प्रशासनाने दिव्यातील डम्पिंग ग्राउंड बंद केल्याची घोषणा केली खरी मात्र दिवा शहरातील कचरा उचलला जात नसल्याने दिवा शहराचे डम्पिंग ग्राउंड महापालिकेने केले आहे. कचरा संकलन करण्यात महापालिकेला स्वारस्य नाही का? असा प्रश्न आम्हाला पडतो. दिवा शहरात दररोज नागरिकांच्या घरात निर्माण होणारा कचरा टाकायचा कुठे? हा सर्वसामान्य जनतेचा प्रश्न आहे. कचरा संकलनाच्या गाड्या दिवा शहरात पुरेशा नाहीत. दिवा शहरात नागरिकांच्या इमारतींमधील कचरा वेळेवर उचलला जात नाही.कचरा टाकण्यासाठीच्या कचराकुंड्या शहरात ठीक ठिकाणी नाहीत. त्यामुळे रस्त्याच्या कडेला अनेक ठिकाणी कचरा साचलेला पाहायला मिळतो. रस्त्याच्या कडेला टाकलेला कचरा देखील महापालिकेचा स्वच्छता विभाग उचलत नाही. एकीकडे स्वच्छतेच्या गप्पा महापालिका प्रशासन मारत असताना दुसरीकडे दिवा शहराला बकाल स्वरूप निर्माण झाले आहे. महापालिका प्रशासन याकडे लक्ष देणार आहे का? पालिका आयुक्तांनी दिव्यातील स्वच्छतेकडे गांभीर्याने लक्ष द्यावे अशी आमची त्यांना विनंती आहे.



- विजय भोईर

सचिव, भाजपा ठाणे

दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

सोमवार, दि. ३० सप्टेंबर २०२४



# सोसायट्यांच्या कचऱ्यापासून खतनिर्मितीसाठी अत्याधुनिक यंत्रणा सज्ज

## घोडबंदरातील गोदरेज एमरॉल्ड सोसायटीत शुभारंभ





**ठाणे :** भारत सरकारच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत आता सोसायटीतील कचऱ्याची सोसायटीनेच विल्हेवाट लावावी असे स्थानिक स्वराज्य संस्थांना आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे आता बहुतेक सोसायट्यांनीच स्वतः चे कचरा संकलन केंद्र सुरू केले असून ठाण्यातील घोडबंदर रोडवरील एमरॉल्ड सोसायटीत अत्याधुनिक खतनिर्मिती यंत्रणा बसविण्यात आली आहे. दररोज १ टन खतनिर्मिती या प्रकल्पातून केली जात असून हे खत सोसायट्यांनी कुंड्यांमध्ये वापरले जात आहे. घोडबंदरातील गोदरेज एमरॉल्ड या सोसायटीने हा प्रकल्प खरेदी करून पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबविण्यासाठी एक सकारात्मक पाउल टाकले आहे. हा प्रकल्प अमालगुस या कंपनीतर्फे हाताळला जात असून या योजनेचा आजुबाजूच्या इतर सोसायट्यांनी लाभ होवू शकतो, असा विश्वास गोउदरेज एरॉल्डच्या रहिवाशांनी व्यक्त केला आहे.

ठाण्यातील गोदरेज एमरॉल्ड सोसायटीमध्ये नुकताच कचऱ्यापासून खतनिर्मिती प्रकल्प बसविण्यात आले आहे. गोदरेज एमरॉल्ड सोसायटीचे अध्यक्ष दादासाहेब गवळी, सचिव योगेश चौधरी, खजिनदार तेजींदर वाही यांच्या प्रयत्नामुळे सोसायटीतील कचऱ्याची विल्हेवाट लावून त्यापासून खतनिर्मिती करता यावी यासाठी प्रयत्न करण्यात आले. त्यानुसार अक्षय कोळी यांच्या अमालगुस कंपनीमार्फत कचऱ्यापासून खत निर्मिती यंत्रणेत कर्मचारी यंत्रणा राबवून हा प्रोजेक्ट यशस्वीरित्या मार्गी लावला आहे.

भारत सरकारच्या स्वच्छता अभियानात आपल्या सोसायटीने सहभागी व्हावे या हेतूने पर्यावरणाच्या रक्षणासाठी सोसायटीतील कचरा संकलित करून त्यापासून खत तयार करून तो सोसायटीतीलच झाडांना वापरण्यात यावा यासाठी अमालगूस या कंपनीच्या माध्यमातून अत्याधुनिक यंत्रणेवर देखरेख करण्यात येत आहे. तिचा शुभारंभ नुकताच करण्यात आला. या कचऱ्यापासून खतनिर्मिती प्रकल्पात दिवसाला १ टन कचरा संकलित करून त्यावर प्रक्रिया केली जाते. या प्रकल्पावर काम करणारे कामगार अगदी सेफ्टी उपकरणे वापरून कचऱ्यातून प्लास्टिक आणि इतर अनावश्यक घटक वेगळे करून खत प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तुंचा समावेश करून ही प्रक्रिया पार पाडत असतात.

या खत प्रकल्पात तयार झालेले खत हे सोसायटीव्यतिरिक्त ठाणे महानगरपालिकेच्यावतीने रस्त्याच्या दुतर्फा लावण्यात आलेल्या झाडांनाही हे खत पुरविण्यात येते. ठाण्यात इतर सोसायट्यांनीही हा प्रकल्प आपापल्या सोसायटीत सुरू केल्यास कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा प्रश्न सुटून शहराच्या बाहेर निर्माण होणारे डम्पिंग ग्राउंडवरील ताण कमी होवून हे कचऱ्यापासून तयार होणारे खत आपल्याच परिसरातील झाडांची निगा राखून त्यांची सर्वोत्तम वाढ होण्यास मदत करतील, असा आशावाद अमालगुस या कंपनीचे व्यवस्थापक अक्षय कोळी यांनी व्यक्त केला आहे.

# ८४६ सर्प दंश रुग्णांचे प्राण वाचविण्यात जिल्हा रुग्णालयाला यश

**ठाणे :** यंदा पावसाळ्यात ठाणे जिल्ह्यात नाग (सर्प) चांगला फणा काढण्याचे उपचारार्थ दाखल झालेल्या रुग्णांच्या आकडेवारी स्पष्ट दिसत आहे. तर जिल्हा रुग्णालयासह उपजिल्हा आणि ग्रामीण रुग्णालयात लस उपलब्ध असल्याने एकाचाही मृत्यू झाला नसून उपचारार्थ दाखल झालेल्या ८४६ जणांचे प्राण वाचविण्यात त्यांना यश आले आहे. तर, ही आकडेवारी जून, जुलै आणि ऑगस्ट या पावसाळ्यातील अवघ्या तीन महिन्यातील असून सर्वाधिक ३१० जणांना जुलै महिन्यात सर्पदंश झाला होता अशी माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली.

पावसाळ्यात विशेषतः शेतीची कामे केली जातात. या काळात सरपटणाऱ्या या प्राण्याचा संचार वाढलेला दिसून आला. झाडा झुडपात चालताना किंवा शेतात काम करतांना साप, विंचू सारखे जीव चावण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे चालताना खूप सावध आणि सुरक्षित चालणे गरजेचे आहे. रानवाटा, गवत, अडगळीच्या जागेत दडून बसलेला साप दंश करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ठाणे जिल्ह्यात मण्यार, घोणस, नाग आणि फुरसे है चार प्रामुख्याने विषारी साप आढळतात. यामध्ये मण्यार साप सर्वाधिक विषारी असून, हा साप चावल्यावर वेळेत उपचार मिळणे गरजेचे आहे. अन्यथा रुग्णाचा मृत्यूचा धोका वाढतो. रात्रीच्या वेळेत या सापांचा संचार जास्त असून, झोपलेले असताना, अथवा झाडी झुडप गवतातून चालताना हा साप दंश करतो. हा साप चावला तरी पटकन समजून येत नाही. मात्र या सापाचे विष अधिकच धोकेदायक आहे. गेल्या काही दिवसात मण्यार अणि घोणस साप चावल्याचे रुग्ण उपचारासाठी आले होते.अशाप्रकारे जून महिन्यात २४९, जुलै महिन्यात ३८० आणि ऑगस्ट महिन्यात २१७ असे एकूण ८४६ सर्प दंश झालेले रुग्ण ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाले होते. त्या सर्वांवर उपचार करून त्यांचे प्राण वाचविण्यात आलेले आहेत, अशी माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली.

***एखाद्या व्यक्तीस साप चावल्याचे समजल्यावर क्षणाचाही विलंब न करता तात्काळ जवळच्या सरकारी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करावे. काही वेळा मांत्रिक, भगत अथवा भक्ताकडे सापाचे विष उतरवण्यासाठी नेले जाते. मात्र वेळेत सर्प दंश झालेल्या व्यक्तीला उपचार मिळाले नाही तर तो रुग्ण दगावण्याची शक्यता अधिक असते. आपल्या सर्व शासकीय रुग्णालयात सर्प दंशावरील लस उपलब्ध आहेत.***

***–डॉ. कैलास पवार,*** *जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे*

# रेखा सिनकर यांचे निधन

**ठाणे :** कोपरीतील रेखा रवींद्र सिनकर (८०) यांचे नुकतेच निधन झाले. गेले काही दिवस त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यांच्या



पश्चात दोन मुले, एक मुलगी, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे. त्या ज्येष्ठ पत्रकार डॉ. प्रशांत सिनकर यांच्या मातोश्री आहेत. अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी पत्रकार, राजकीय, शासकीय, सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५

संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. ३० सप्टेंबर २०२४
पान : ३
www.diwanews.com




# ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयावर झेडपी शिक्षकांचे निदर्शने

**ठाणे** : १५ मार्चच्या संच मान्यतेचा शासन निर्णय रद्द करा, कंत्राटी शिक्षक भरती रद्द करा, विद्यार्थ्यांना वेळेत गणवेश द्या या आदी मागण्यांसाठी ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळां मधील हजारो शिक्षकांनी सामूहिक किरकोळ रजा घेत, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बुधवारी जोरदार निदर्शने केली. जिल्ह्यातील सर्व शिक्षक संघटना या आंदोलनात उतरल्याने जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळा बंद होत्या. यावेळी ठाणे जिल्हा शिक्षक समन्वय समितीच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी संदीप माने यांच्याकडे मागण्यांचे निवेदन दिले.




### या जीआर ला विरोध

- १५ मार्च २०२४ चा संच मान्यता निर्णया रद्द करा.
- कमी पटसंख्येच्या शाळेत कंत्राटीत शिक्षक भरतीचा निर्णय रद्द करा.
- शैक्षणिक व शैक्षणिक कामाचा शासन निर्णय शिक्षक संघटनांबरोबर चर्चा करून दुरुस्त करा.

आधारवर आधारित संचमान्यता, वीस पटाला एक कायम व एक कंत्राटी शिक्षक हे शासनाचे धोरण विद्यार्थी विरोधी असल्याने शिक्षक संघटना व पालकांचा या धोरणास विरोध आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शासनाने या निर्णयामध्ये अंशतः बदल करून वीस ऐवजी दहा पटाला एक कंत्राटी शिक्षक, प्रत्यक्ष वर्गातील विद्यार्थी संख्येवर शिक्षक निश्चिती यासारखे शासन निर्णय निर्गमित केले असले तरी आंदोलनावर ठाम राहत शिक्षकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने केली. तसेच मोफत गणवेश योजना चुकीचे पद्धतीने राबविल्याने गणवेश उशिरा प्राप्त होत आहेत. गणवेश योजना जुन्याच पद्धतीने राबवावी. पाठ्यपुस्तकात कोरी पाने न देता स्वतंत्र वही द्यावी. पोषण आहार योजना स्वतंत्र्य योजनेकडे सोपवावी याबाबत प्रामुख्याने घोषणाबाजी करण्यात आली. ठाणे जिल्ह्यातील शिक्षक संघटना व जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थी यामध्ये सहभागी झाल्याने आज शाळा बंद ठेवण्याची वेळी शिक्षण विभागावर ओढवली होती.

# घोडबंदरच्या बोरिवडे मैदानावर होणार अद्ययावत क्रिडा संकुल!

**ठाणे** : ओवळा-माजिवडा विधानसभा मतदारसंघातील आमदार प्रताप सरनाईक यांच्या संकल्पनेतून घोडबंदर रोडच्या बोरिवडे येथील महानगरपालिकेच्या २० एकर वरील मैदानाच्या आरक्षित भुखंडावर अद्ययावत क्रिडा संकुल व सिथेंटिक ट्रॅक उभारण्यात येणार आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील क्रिडापट्टू शहरामध्ये सिथेंटिक ट्रॅक असावा अशी मागणी आमदार सरनाईक यांच्याकडे करीत होते. त्यांच्या मागणीला यश प्राप्त झाले असून राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नगरविकास खात्यातर्फे ७५ कोटी रुपये क्रिडा संकुल उभारण्यासाठी मंजूर केलेले असून त्याचा शासकिय आदेश काढण्यात आलेला आहे. बोरीवडे मैदानाच्या जागेच्या सभोवताली कुंपन भिंत, सुसज्य प्रवेशद्वार त्याचबरोबर क्रिडा संकुलासाठी तळ अधिक एक मजल्याची इमारत उभारण्यात येणार आहे. या क्रिडा संकुलामध्ये इनडोअर क्रिकेट बरोबरच हॉलीबॉल, बास्केटबॉल, बॅटमिंटन, स्कॉश कोर्ट, मल्लखांब त्याचबरोबर कबड्डी व कुस्तीसाठी मॅटचाही वापर होणार आहे. हे दोन्ही खेळ मातीत खेळण्यासाठी व मॅटवर खेळण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आलेले आहे. मुंबईतील बी.के.सी. येथील एम.सी.ए. क्लबच्या धर्तीवर विविध इनडोअर खेळ खेळविले जाणार असून भविष्यामध्ये नामवंत प्रशिक्षकांची याठिकाणी व्यवस्था करण्यात येणार आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अनेक अँथलेटिक्स पट्टू ठाण्यातील दादोजी कोंडदेव स्टेडियम मध्ये सिथेंटिक ट्रॅक नसल्यामुळे त्यांचा सराव व्यवस्थित होत नसल्यामुळे ते सरावासाठी मुंबईतील सिथेंटिक ट्रॅकवर जात असतात. तेथे जाण्यासाठी त्यांचा प्रवासामध्ये ४ ते ५ तासाचा वेळ जात असल्यामुळे ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये सिथेंटिक ट्रॅक करावा अशी मागणी क्रिडापट्टू वारंवार आमदार सरनाईक यांच्याकडे करीत होते. आता त्यांच्या मागणीला पुर्णविराम मिळाला असून पुढील महिन्यात या कामाला सुरूवात होणार आहे. बोरीवडे येथील या मैदानावर महानगरपालिकेच्या वतीने पी.पी.पी. तत्वावर बी.के.सी. येथील एम.सी.ए.च्या धर्तीवर क्रिकेट क्लब व्हावा अशी मागणी नागरिक व क्रिडापट्टू यांच्याकडून होत होती. त्यानुसार शहर विकास विभागाने सजेशन ऑब्जेक्शन मागविले होते. त्यावेळी आमदार सरनाईक यांनी आयुक्त सौरभ राव यांच्याकडे विनंती करून घोडबंदर रोड येथे दिवसेंदिवस वस्ती वाढत असून हे एकमेव मोठे मैदान असल्याने सदरचा प्रकल्प मोघरपाडा येथील जागेवर हलविण्याची विनंती केली असता मा. आयुक्तांनी विनंती मान्य केली असून मोघरपाडा येथे भविष्यामध्ये एम.एम.आर. डी.ए.च्या जागेवर क्लब व क्रिकेट अँकेडमी बनविण्यात येणार आहे.

# स्वच्छता ही सेवा मोहीमेत उद्यानांचीही सखोल स्वच्छता






**नवी मुंबई : 'स्वच्छता ही सेवा' मोहीमेमध्ये महानगरपालिका क्षेत्रातील वर्दळीच्या ठिकाणी तसेच दुर्लक्षित ठिकाणी सखोल स्वच्छता मोहीमा हाती घेण्यात येत असून या अंतर्गत आठ विभाग कार्यालय क्षेत्रातील मोठया उद्यानांमध्येही सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता विषयक विविध उपक्रम 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' या अभियानात राबविण्यात येत असून उद्यान विभागाचे उपआयुक्त श्री. दिलीप नेरकर यांच्या नियंत्रणाखाली विविध १३ उद्यानांमध्ये लोकसहभागातून सखोल स्वच्छता करण्यात आली. यापुढील काळात इतरही उद्यानांमध्ये स्वच्छता मोहीमा राबविण्यात येणार आहेत.**

या स्वच्छता मोहीमेमध्ये उद्यानांतील माळी व बहुउद्देशीय सेवक यांच्यासमवेत उद्यान अधिक्षक, उद्यान सहाय्यक तसेच स्वच्छताकर्मी आणि एनएसएसचे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला व इतर स्वच्छताप्रेमी नागरिक उत्साहाने सहभागी होते. या स्वच्छता मोहीमे अंतर्गत बेलापूर विभागात से ११ सागरविहार, से २ मँगो उद्यान, डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान या उद्यानांमध्ये स्वच्छता करण्यात आली. नेरुळ विभागातही से ४ येथील नेताजी सुभाषचंद्र बोस उद्यान, सरदार वल्लभभाई पटेल उद्यान, डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान त्याच प्रमाणे वाशी विभागात से १० मिनाताई ठाकरे उद्यान, से ९ राजीव गांधी जॉगर्स पार्क याठिकाणी लोकसहभागातून स्वच्छता मोहीम



पार पडली. कोपरखैरणे निसर्ग उद्यान याठिकाणच्या स्वच्छता मोहीमेत २५० हून अधिक नागरिक सहभागी झाले. से २२ कोपरखैरणे उद्यान व चिकणेश्वर उद्यान याठिकाणीही लोकसहभागातून स्वच्छता मोहीम पार पडली. घणसोलीतील सेंट्रल पार्क येथेही मोठया संख्येने नागरिक उद्यान स्वच्छता मोहीमेत सहभागी झाले. ऐरोली विभागात दिवागाव तलाव परिसरातील हरितपट्टयाची लोकसहभागातून स्वच्छता करण्यात आली. अशाच प्रकारच्या उद्यान स्वच्छता मोहीमा इतरही उद्यानांमध्ये राबविण्यात येत असून या माध्यमातून 'स्वच्छता ही सेवा' मोहीमेत घनकचरा व्यवस्थापन विभागाप्रमाणेच महानगरपालिकेचे इतरही विभाग सक्रीय सहभागी होत आहेत.

# 'स्वच्छता रन'मध्ये धावले नवी मुंबईकर

**नवी मुंबई** : 'निश्चय केला, नंबर पहिला' अशा घोषणा देत १ हजारहून अधिक नवी मुंबईकरांनी आज 'स्वच्छता रन' मध्ये सहभागी होत स्वच्छतेचा जागर केला. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा' पंधरवड्यात 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' अभियानांतर्गत आयोजित केलेल्या सर्वच उपक्रमांना नागरिकांचा भरघोस प्रतिसाद लाभत आहे. आजही नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या संकल्पनेतून महापालिकेच्या आयकॉनिक मुख्यालय इमारतीसमोर आयोजित करण्यात आलेल्या 'स्वच्छता रन' मध्ये रात्रभर व पहाटे मोठ्या प्रमाणात पाऊस असूनही स्वच्छता ध्येयाने भारलेले हजारहून अधिक नागरिक अतिशय उत्साहाने धावले.

२२ सप्टेंबर रोजी याच ठिकाणी सायक्लोथॉनचे आयोजन







करण्यात आले होते. त्यामध्येही ५०० हून अधिक सायकलपटू उत्साहाने सहभागी झाले होते.

धावणे हा सर्वोत्तम व्यायाम असून या स्वच्छता रनच्या माध्यमातून स्वच्छतेप्रमाणेच आरोग्य जपणुकीचा संदेशही प्रसारित करण्यात आला अशी भूमिका आयुक्तांनी मांडली. स्वच्छता ही प्रत्येक घरापासून सुरू झाली तर घर, परिसर, राज्य, देश स्वच्छ राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी आमदारगणेश नाईक, महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, महाराष्ट्र शासनाच्या स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचे मिशन संचालक नवनाथ वाठ, अतिरिक्त आयुक्तसुनिल पवार वशिरीष आरदवाड, माजी आमदारसंदीप नाईक तसेच महानगरपालिकेचे विभागाप्रमुख आणि अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वच्छता रनच्या आयोजनात स्वच्छ नवी मुंबई मिशनच्या वुमेन आयकॉन रिचा समित यांची लेट्स सेलिब्रेट फिटनेस संस्था आणि द लर्नयार्ड या क्रीडा क्षेत्राशी संबंधित संस्थांचे सहकार्य लाभले.

याप्रसंगी स्वच्छता रन मध्ये सहभागी झालेले कन्याकुमारी ते काश्मिर धावण्याचा जागतिक विक्रम केलेले गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड होल्डर श्री.संजय शर्मा यांना आयुक्तांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

महापालिका अधिका-यांमधून १० किमीची स्वच्छता रन पूर्ण करणारे प्रशासन विभागाचे उपआयुक्त श्री.शरद पवार यांचाही यावेळी गौरव करण्यात आला.

त्याचप्रमाणे १० किमी अंतराची स्वच्छता रन सर्वात जलद पूर्ण करणारे प्रथम ३ क्रमांकाचे मानकरी सुरज गोरे, मनोज गावित आणि गुणवंत जाधव यांचा पारितोषिके देऊन सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे सहभागी महिलांमधून सर्वाधिक कमी वेळेत अंतर पूर्ण करणा-या ज्योती ठाकूर, ममता ठाकूर व सुनिता छैनानी या महिला धावपटूंना सौ. रेवती कैलास शिंदे यांच्या हस्ते सन्मानचिन्हे प्रदान करून गौरविण्यात आले.



# भिवंडी बायपास रस्त्यावर ठामपाची धडक कारवाई

## लोखंडी पत्र्याचे ०६ गाळे, ०७ टपऱ्या, सहा दुकानांच्याबाहेरील पत्र्याच्या शेड काढल्या, सात हातगाड्याही जप्त






**ठाणे :** ठाणे महापालिकेतर्फे शुक्रवारी गोल्डन डाईज नाक्याकडून भिवंडीकडे जाणाऱ्या बायपास रस्त्यालगत असलेल्या अतिक्रमणावर धडक कारवाई करण्यात आली. त्यात, लोखंडी पत्र्याचे ०६ गाळे, ०७ टपऱ्या, सहा दुकानांच्याबाहेरील पत्र्याच्या शेड काढण्यात आल्या. सात हातगाड्याही जप्त करण्यात आल्या.

माजिवडा गोल्डन डाईज नाक्यावरून भिवंडीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील दुकानांच्या बाहेर सामान ठेवून रस्ता अडवून व्यवसाय करण्यात येत होता. महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार करावाई करण्यात आली.

गॅरेज, प्लायवुडचे दुकान, भंगाराची दुकाने यांच्यावर कारवाई करतानाच, दुकानांबाहेर ठेवलेल्या वस्तूही जप्‌ करण्यात आल्या. दुकानांबाहेरील अवैध शेड तोडण्यात आले. त्यासोबत, हातगाडी, फेरीवाले यांच्यावरही निष्कासन कारवाई करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कारवाईत, उपायुक्त (परिमंडळ ३) दिनेश तायडे, सहाय्यक आयुक्त अलका खैरे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यासिम तडवी यांच्यासह परिमंडळ तीन मधील कर्मचारी, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी सहभागी झाले होते.

या कारवाईत, या कारवाईत लोखंडी पत्र्याचे ०६ गाळे, ०७ टपऱ्या, सहा दुकानांच्याबाहेरील पत्र्याच्या शेड काढण्यात आल्या. सात हातगाड्या जप्त करण्यात आल्या. याचसोबत रस्त्यावर पडलेला कचरा, बांधकामाचा राडारोडा उचलून या परिसराची स्वच्छताही करण्यात आली. तसेच, अवैधपणे पार्किंग करण्यात आलेली वाहने हटविण्यात आली. ही कारवाई नियमितपणे सुरू राहणार असल्याची माहिती उपायुक्त दिनेश तायडे यांनी दिली.



# पाणी बिल थकवणाऱ्यांवर पालिकेची कारवाई

## ६११ नळ जोडण्या केल्या खंडित



**ठाणे :** ठाणे महापालिकेची पाणी बिल थकबाकी वसुलीकरता पाणी पुरवठा विभागाने धडक कारवाई मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेत संपूर्ण महापालिका क्षेत्रात आतापर्यंत ६११ नळ जोडण्या खंडित केल्या असून ३० मोटर पंप जप्त केले आहेत. या पाणी बिल वसुली अभियानात आतापर्यंत सुमारे ३३ कोटी रुपयांची वसुली करण्यात आली आहे. दरम्यान, पाणी बिलाची रक्कम वेळच्या वेळी भरून महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन संबंधित विभागाने केले आहे.

महापालिकेची पाणी बिल रक्कम सुमारे २२४ कोटी रुपयांच्या घरात आहेत. त्यापैकी, ७६ कोटी रुपये ही थकबाकी असून चालू वर्षाची बिल रक्कम ही १४८ कोटी रुपये आहे. पाणी बिलाची थकबाकी न भरल्यास नळ जोडणी खंडित करून पाणी पुरवठा बंद करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत. त्या पार्श्वभूमीवर, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी बिलाच्या साप्ताहिक वसुलीचे लक्ष्य निर्धारित करून पाणी बिल वसुली अभियान सुरू करण्यास सांगितले होते. त्यानुसार, पाणी बिलाच्या थकबाकीसह वसुलीसाठी महापालिकेच्या सर्व प्रभागात नळ जोडणी खंडीत करणे, मोटर पंप जप्त करणे, मीटर रुम सील करण्यात येत आहेत. तसेच, पाणी बिलाचा भरणा न करता, खंडित नळ जोडणी परस्पर पुन्हा कार्यान्वित करुन घेतल्यास गुन्हे दाखल करण्याचीही कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती उपनगर अभियंता विनोद पवार यांनी दिली.

महापालिका कार्यक्षेत्रातील घरगुती वापरासाठी असलेल्या नळ संयोजनाच्या थकीत देयकाची चालू वर्षाच्या मागणीसह पूर्ण भरणा केल्यास प्रशासकीय आकारामध्ये १०० टक्के सूट लागू करण्यास महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी मान्यता दिली आहे. थकीत पाणीपट्टी बिलावरील दंडात १०० टक्के इतकी भरीव सवलत जाहीर करण्यात आल्याने नागरिकांना आर्थिक दिलासा मिळणार असून या योजनेचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

ही योजना १ सप्टेंबर २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत लागू राहील. वरील योजनेचा लाभ घेऊन थकीत व चालू पाणी देयकाची रक्कम पूर्णपणे भरुन त्यावरील प्रशासकीय आकारामध्ये १०० टक्के सवलत योजनेचा लाभ नागरिक घेवू शकतील. या धोरणात्मक निर्णयापूर्वी ज्या घरगुती पाणी बील धारकांनी पाणी पुरवठा देयके जमा केली असतील अशांना सदरची सवलत योजना लागू असणार नाही. तसेच ही योजना व्यवसायिक संयोजन धारकांना लागू असणार नाही.

# राज्यातील ४ हजार ९७५ आदिवासी गावांचा कायापालट होणार

## प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानात समावेश

**ठाणे :–** दुर्गम अतिदुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानाला केंद्र सरकारने हिरवा कंदील दाखविला आहे. त्यामुळे देशातील ६३ हजार तर महाराष्ट्रातील ४ हजार ९७५ आदिवासी गावांचा कायापालट होणार आहे. या माध्यमातून राज्यामधील ३२ जिल्ह्यांतील १२

लाख ८७ हजार ७०२ आदिवासी बांधवाचे सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरण केले जाणार आहे. या अभियानासाठी आवश्यक निधी केंद्र आणि राज्य सरकारकडून उपलब्ध होणार आहे.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सन २०२४–२५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानाची घोषणा केली होती. गेल्या आठवड्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कॅबिनेट बैठकीत या अभियानाला मंजुरी देण्यात आली. या अभियानाचा शुभारंभ ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. 'पीएम–जनमन' अभियानात १७ मंत्रालयांद्वारे राबवण्यात येणाऱ्या विविध २५ उपक्रमांचा समावेश असणार आहे. त्याद्वारे सामाजिक पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, अजीविका यामधील तफावत भरून काढण्याचा प्रयत्न असणार आहे. तसेच आदिवासी क्षेत्र आणि समुदायांच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासावर भर दिला जाणार आहे.

प्रधानमंत्री जनजातीय उन्नत ग्राम अभियानात सहभागी प्रत्येक मंत्रालयावर पुढील ५ वर्षात निश्चित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अनुसूचित जमातींचा विकास कृती आराखडा तयार करून उपलब्ध निधीद्वारे त्यांच्याशी संबंधित योजना कालबद्ध पद्धतीने कार्यान्वित करण्याची जबाबदारी असणार आहे. दरम्यान, या अभियानांतर्गत समाविष्ट असलेली आदिवासी गावे पीएम गतिशक्ती पोर्टलवर संबंधित विभागाद्वारे त्याच्या योजनेतून मॅप केल्या जातील. पोर्टलचे भौतिक आणि आर्थिक प्रगतीचे परीक्षण केले जाईल. सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यांना पुरस्कार देण्यात येणार आहे.

या सुविधा मिळणार :– पक्की घरे, ग्रामीण भागात रस्ते, प्रत्येक घरात शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय, सर्व घरांमध्ये वीज जोडणी, मोबाईल मेडिकल युनिटची स्थापना, आयुष्मान कार्ड, एलपीजी कनेक्शन, आदिवासी बहुउद्देशीय विपणन केंद्र, आश्रमशाळांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा, सिकलसेल ॲनिमियाशी लढण्यासाठी केंद्राची निर्मिती, होम स्टे.

जिल्हानिहाय गावांची संख्या :– ठाणे–१४६, पालघर–६५४, रायगड–११३, रत्नागिरी–१, अहमदनगर–११८, अकोला–४३, अमरावती–३२१, छत्रपती संभाजीनगर–११, बीड– २, भंडारा–१४, बुलढाणा –४३, चंद्रपूर–१६७, धुळे–२१३, गडचिरोली–४११, गोंदिया–१०४, हिंगोली–८१, जळगाव–११२,जालना–२५, कोल्हापूर–१, लातूर–२, नागपूर–५८, नांदेड–१६९, नंदुरबार–७१७, नाशिक–७६७, उस्मानाबाद–४, परभणी–५, पुणे–९९, सातारा–४, सोलापूर–६१, वर्धा–७२, वाशीम–७१, यवतमाळ–३६६ असे महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास विभाग आदिवासी आयुक्तालय, नाशिक जनसंपर्क अधिकारी नितीन रणशूर (मोबाईल नंबर ७६२०००६८३१) यांनी कळविले आहे.


|| एकमेका सहाय्य करुं, अवघे धरुं सुपंथ ||
स्थापना १९८७

**स्नेही सहकारी पतसंस्था मर्या. मुंबई**

बीओएम/ डब्लूडी /आर.एस.आर./(सि.आर.)/४००/१९८६-८७

प्रशासकीय कार्यालय :– स्नेही भवन, ३१५ बस डेपो जवळ, हॉटेल सेलिब्रेशनच्या बाजूला, शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व), मुंबई–४०००५१. संपर्क : ८५९१८६६८९०
Email: snehipatsanstha.bandra@gmail.com

◆ प्रभावी व्यवस्थापन ◆ नवा विश्वास ◆ नवी उमेद

✲ शाखा ✲
- बांद्रा – ८५९१८६६८९०
- नायगाव (वसई) – ९०८२३६२१४३
- मलकापूर (कोल्हापूर) – ९४०३७६७१३४
- अंबाडी(भिवंडी) – ८९९९६३८२२२
- दिवा (ठाणे) – ७४०04५४१६८

अधिकृत भागभांडवल :– रु. ५ कोटी
वसुल भागभांडवल :– रु. १ कोटी
एकुण ठेवी :– रु १२ कोटी
कर्ज :– रु. ८.५ कोटी
गुंतवणूक :– रु. २ कोटी
खेळते भांडवल :– रु. २५ कोटी





**संस्थेच्या आकर्षक ठेव योजना व व्याज दर**

**मुदत ठेव**
३० दिवस ते ९० दिवसांपर्यंत :– ६%
९१ दिवस ते १८० दिवसांपर्यंत :– ७%
१८१ दिवस ते ३६४ दिवसांपर्यंत :– ८%
१ वर्ष पूर्ण :– ९ %
२ वर्ष पूर्ण :– ९.५० %
३ वर्ष पूर्ण :– १०%
ज्येष्ठ नागरिक यांना अर्धा टक्के व्याज अधिक

**दामदुप्पट ठेव**
मुदत ७ वर्ष ६ महिने

**आवर्त ठेव**
१ वर्ष ८% | २ वर्ष ९% | ३ वर्ष १०%

**दैनंदिन (धनलक्ष्मी) ठेव**
६ महिने पूर्ण ३.५% | १ वर्ष ६% | २ वर्ष ७% | ३ वर्ष ८%

✲ संस्थेची ठळक वैशिष्ट्ये ✲
- तत्पर सेवा
- मायक्रो फायनान्स (ग्रुप लोन)
- कुशल व उच्च शिक्षित अभ्यासु नेतृत्व

**सोने तारण कर्जाची खास सोय**

त्वरीत जवळच्या शाखेत संपर्क साधावा

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. ३० सप्टेंबर २०२४


# आदर्श इंग्लिश स्कुलमध्ये डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अवकाश निरीक्षण केंद्राचे सोमवारी उद्घाटन

ठाणे - आदर्श इंग्लिश स्कुलमध्ये डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अवकाश निरीक्षण केंद्राचे उदघाट सोमवार, दिनांक ३० सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता संपन्न होणार आहे.

हेन्कल अढेसिव्ह टेक्नॉलॉजि प्रायव्हेट लिमिटेड यांच्या प्रायोजकतेतून व ग्लोबल मिशन अस्ट्रॉनॉमी अँड रिसर्च सेंटर यांच्या मार्गदर्शनाखाली सदर अवकाश निरीक्षण केंद्र सुरु करण्यात आले आहे.

हेन्कलच्या माध्यमातून याआधी असे ११ केंद्र पुणे व नवी मुंबई येथे सुरु करण्यात आले आहेत. ठाण्यातील पहिले अवकाश निरीक्षण केंद्र आदर्श इंग्लिश स्कुल मध्ये सुरु केले जाणार आहेत.

ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. काशिनाथ देवधर यांच्या शुभहस्ते उदघाट संपन्न होणार आहे. उद्घाटन समारंभासाठी हेन्कल लिमिटेडचे मुख्य आर्थिक अधिकारी कृष्णा प्रसाद, ग्लोबल मिशनचे प्रमुख डॉ. प्रसाद खंडागळे, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ सौ. मीरा कोर्डे तसेच आदर्श विकास मंडळाचे अध्यक्ष सचिन मोरे व कार्यकारी विश्वस्त सौ. श्रद्धा मोरे उपस्थित राहणार आहेत.

विद्यार्थ्यांना अवकाशासंबंधी मार्गदर्शन करणे, अवकाश संशोधनाप्रती गोडी निर्माण करणे व विविध उपकरणांच्या माध्यमातून प्रत्यक्षिके करण्याच्या उद्देशाने सदर अवकाश केंद्राच्या माध्यमातून प्रयत्न केले जाणार आहेत.

ठाणे शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी अवकाश केंद्र भेट प्रकल्प राबविण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष सचिन मोरे यांनी दिली.

सदर कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, शिक्षक, हेन्कल लिमिटेडचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# धनगरांचा आदिवासी प्रवर्गात समाविष्ट करण्यास आदिवासींचा विरोध

## सोमवारी ठाण्यात मोर्चा

**ठाणे :-** राज्य सरकारने धनगर समाजाला आदिवासी प्रवर्गात म्हणजेच अनुसूचित जमातीअंतर्गत आरक्षण देण्यासाठी समिती गठीत केली आहे. त्या निषेधार्थ तसेच अनुसूचित जमाती प्रवर्गात धनगरांचा समावेश करू नये, या मागणीसाठी सोमवारी (दि. ३०) संयुक्त आदिवासी आरक्षण हक्क कृती समितीच्या वतीने ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेण्यात येणार आहे.

१५ सप्टेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र सरकारने धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्यासाठी समितीचे गठन केले आहे. या संदर्भात स्वतंत्र जी. आर. काढण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. त्याविरोधात हा मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला. या मोर्चाच्या आयोजनासंदर्भात आज शासकीय विश्रामगृहात आज (दि.२८) बैठक संपन्न झाली. या बैठकीला अनिल भांगले, हंसराज खेवरा , दीपक पेंदाम, रमेश परचाके, रमेश आत्राम, मधुकर तळपाडे, समीर तडवी आदी उपस्थित होते.

महाराष्ट्रात भटक्या जमातींसाठक एनटी-सी हा प्रवर्ग असून त्यामध्ये केवळ धनगर या एकाच भटक्या जमातींची समावेश आहे. या प्रवर्गास ३.५% आरक्षण देण्यात आलेले आहे. उलटपक्षी एसटी प्रवर्गासाठी ७ टक्के आरक्षण असून सुमारे ४७ जातींचा समावेश त्यामध्ये आहे. दिवसागणिक अनुसूचित जमातींची संख्या वाढत असल्याने धनगरांचा समावेश केल्यास मूळचा आदिवासी बांधव आरक्षणापासून वंचित राहणार आहे. अशा स्थितीत जर शासन अध्यादेश काढणार असेल तर ते घटनाबाहय ठरणार आहे त्यामुळेच घटनाबाह्य निर्णयाला विरोध दर्शविण्यासाठी संयुक्त आदिवासी आरक्षण हक्क कृती समिती मुंबई व ठाणे यांच्या वतीने हा मोर्चा काढण्यात येणार आहे, हंसराज खेवरा आणि अनिल भांगले यांनी सांगितले.

सोमवारी सकाळी १० वाजता भगवती शाळेपासून या मोर्चाला सुरूवात होणार असून गोखले रोड, राम मारुती रोड मार्गे, पु.ना. गाडगीळ ज्वेलर्स चौकातून तलावपाळी रोड, राजवंत ज्वेलर्स पासून डावीकडे गडकरी रंगायतन चौकातून उजवे वळण घेऊन चिंतामणी चौक, जांभळी नाका येथून अग्यारी रोड मार्गे टेंभी नाका येथून उजवीकडे कोर्ट नाका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पुढे राघोजी भांगरे चौक, कोर्ट नाका शासकीय विश्रामगृह येथे मोर्चाचे सभेत रुपांतर होईल, असेही संयुक्त आदिवासी आरक्षण हक्क कृती समितीच्या वतीने सांगण्यात आले.

SHWAAS
ACE NX HOSPITAL & RESEARCH CENTRE
Superspeciality Hospital
Our Passion Your Care
२५,००० ते २,००,००० पर्यंत विमा योजना

मुख्यमंत्री सहायता निधी
CM Relief Fund
फुफ्फुस प्रत्यारोपण
हाताचे प्रत्यारोपण
हिप रिप्लेसमेंट
गुडघ्यांचे प्रत्यारोपण
अपघात शस्त्रक्रिया
विद्युत अपघात रुग्न
कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन)
नवजात शिशुंचे आजार
लहान बालकांचे शस्त्रक्रिया
बर्न रुग्न
अपघात
मेंदूचे आजार
हृदयरोग
कर्करोग शस्त्रक्रिया
डायलिसिस
Address
Mahavir height, Golul Nagari, opp. Mumbai University, Wayle Nagar, Khadakpada, Kalyan, Maharashtra- 421301
Emergency
7777008464
9076229076

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. ३० सप्टेंबर २०२४

www.diwanews.com

# तरण तलाव खुला करण्यासाठी आमदार संजय केळकर यांचा अल्टीमेटम



## बाळकुम येथील बंद तरण तलावात ठाणेकर मारणार सूर

**ठाणे :** बाळकुम येथील धर्मवीर आनंद दिघे तरण तलाव मागील दोन वर्षांपासून बंद असून ठाणेकर या सुविधेपासून वंचित आहेत. हा तलाव १ ऑक्टोबरपर्यंत खुला न केल्यास नागरिकांना घेऊन या तरण तलावाचा वापर सुरू करू, असे आमदार संजय केळकर यांनी म्हटले आहे. तसेच येत्या १ ऑक्टोबरपर्यंत हा तरण तलाव खुला करावा अन्यथा नागरिकांना घेऊन त्याचा वापर सुरू करू, असा इशाराच यावेळी आमदार केळकर यांनी दिला.

गेली दोन वर्षे बंद असलेल्या आणि वादग्रस्त ठरलेल्या बाळकुम येथील तरण तलावाची पाहणी आमदार संजय केळकर यांनी अधिकाऱ्यांसह केली. ३० कोटी खर्च करून उभारलेल्या या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तरण तलावाचे उद्घाटन २०२२ साली झाले. मात्र यावर झालेला कोट्यवधींचा खर्च आणि कामातील त्रुटी यामुळे यात मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप होत होता. शिवाय गेली दोन वर्षे त्याचा वापर करण्यास खुला करण्यात न आल्याने ठाणेकर या सुविधेपासून वंचित राहिले आहेत.

या तरण तलावाच्या कामाची पाहणी आमदार संजय केळकर यांनी गेल्या दोन वर्षांत चार ते पाच वेळा करून अधिकाऱ्यांना सूचना केल्या होत्या. तसेच झालेल्या कामांबाबत संशय व्यक्त करून प्रशासनाच्या अक्षम्य दिरंगाईबाबत संताप व्यक्त केला होता.

आज सोमवारी केळकर यांनी केलेल्या पाहणीत अधिकाऱ्यांना चांगलेच झापले. अजून काही त्रुटी शिल्लक असून या कामांबाबतच्या कागदपत्रांची मागणी त्यांनी केली. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता कलाल, उप अभियंता रोहित गुप्ता, उपायुक्त मीनल पालांडे, तसेच तरण तलाव विभाग आणि प्रभाग समितीचे संबंधित अधिकारी, भाजपचे रवी रेड्डी, ॲड.हेमंत म्हात्रे, तन्मय भोईर, भानुदास भोईर, भावेश पाटील, अनुराधा रोकडे, मेघनाथ घरात, आदी उपस्थित होते.



### कला भवनचे कुलूप कधी उघडणार?

**तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी उद्घाटन केलेले कलाभवन गेली काही वर्षे नादुरुस्त अवस्थेत असून धूळ खात पडले आहे. हे शहर सांस्कृतिक असून येथे अनेक कलाकार आणि कला रसिक नागरिक आहेत. याची दुरुस्ती करून ठाणेकरांना ते तातडीने उपलब्ध करून द्यावे अशी मागणी आमदार संजय केळकर यांनी अनेक वेळा केली आहे. अशा अनेक वास्तूंच्या कामात भ्रष्टाचार होऊन त्या धूळ खात पडल्या असल्याची माहिती केळकर यांनी दिली.**

# मविआच्या 'खोटा फॅक्टरी'ला न्यायालयानेच टाळे ठोकले!

## राऊत यांच्या शिक्षेवर भाजपाची प्रतिक्रिया

ठाणे: उबाठा सेनेचा भोंगा आणि मविआचा स्वयंघोषित प्रवक्ता अशी दुतोंडी ओळख असलेले संजय राऊत यांच्या खोटेपणाचे पितळ उघडे पडल्यावर आता त्यांनी न्यायसंस्थेवरही ताशेरे मारण्यास सुरुवात केल्याने, त्यांचा तोल पुरता ढळल्याचे स्पष्ट झाले आहे. महाराष्ट्राच्या जनतेस मूर्ख समजून मनाला येईल त्या खोट्या कंड्या पिकविण्याचा राऊत यांच्या कारखान्याला न्यायालयाने टाळे लावले असून त्यांना झालेली शिक्षा म्हणजे संपूर्ण महाविकास आघाडीच्या खोटे पसरविण्याच्या उद्योगाला मिळालेली चोख चपराक आहे, अशी खरमरीत टीका भाजप चे आमदार ॲड निरंजन डावखरे यांनी शुक्रवारी ठाण्यात एका पत्रकार परिषदेत केली.

अनैतिक मार्गाने व जनादेश धुडकावून केवळ उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदावर बसविण्यासाठी मविआच्या नावाने सत्तेवर डल्ला मारण्याचा डाव फसल्यामुळे संजय राऊत सैरभैर झाले असून महायुती सरकारच्या गतिमान विकास कामांमुळे सुरू असलेल्या प्रगतीची पोटदुखीही त्यांना जडली आहे. त्यामुळेच, सत्ता गेल्यानंतर संपूर्ण महाविकास आघाडीने फेक नॅरेटिव्ह फैलावून जनतेची दिशाभूल करण्याचा कट रचला. राज्यातून उद्योग परराज्यात गेल्याची अफवा, अटल सेतूला तडे गेल्याचा कांगावा, संविधान बदलण्याचा अपप्रचार, महाराष्ट्राचा मणिपूर होणार अशी भाकिते करून नागरिकांमध्ये भय निर्माण करण्याचा कट, अशी अनेक कारस्थाने महाविकास आघाडीने करून पाहिली, आणि सारी बिनबुडाची असल्याचे सिद्ध होऊन ती फसली. अशा खोट्याच्या फॅक्टरीतून पिकणारे अफवांचे पीक संजय राऊत यांच्या डोक्यात उगवत होते, आणि मविआचे अन्य नेते त्याला खतपाणी घालत होते, असा थेट आरोपही डावखरे यांनी केला.

याच सडक्या मानसिकतेतून राऊत यांनी मेधा सोमय्या यांच्यावर बिनबुडाचे आरोप करून सनसनाटी निर्माण करण्याचा प्रयत्न आता त्यांच्या अंगाशी आला आहे. खोट्याच्या पाठीत सोटा या न्यायाने त्यांना त्याची फळे भोगावी लागणार असून महाविकास आघाडीने आता तरी यापासून बोध घेत आपली कातडी वाचवावी व राऊत यांचा भोंगा बंद करावा, असा सल्लाही डावखरे यांनी दिला. खोटी माहिती जाणीवपूर्वक पसरवून राज्यात अस्थिरता निर्माण केल्यास आपल्या आघाडीचे नाकर्ते सरकार पुन्हा सत्तेवर येईल व निष्क्रीय उबाठा नेत्यांना सत्तेची मलई ओरपता येईल असा त्यांचा इरादा धुळीस मिळाला असून न्यायसंस्थेवर चिखलफेक करून त्यांनी जनतेचा उरलासुरला विश्वासही गमावला आहे, असे डावखरे म्हणाले.

यावेळी प्रवक्ते सागर भदे, सरचिटणीस मनोहर सुगदरे व युवा मोर्चा अध्यक्ष सुरज दळवी उपस्थित होते.